अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. २६/२०१८
जा.क्र उआ (सा.प्र.)/६७०६ दि. २७/०८/२०१८

## अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/२६/२०१८

श्री गजानन श्रीपाद पाथरुडकर
कोथरूड स्टेशन ड्युटी ऑफीसर
कोथरूड अग्निशामक दल, स.नं. २७, वारजे रोड,
पुणे ४११०३८

-------------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

श्री गजानन श्रीपाद पाथरुडकर, कोथरूड स्टेशन ड्युटी ऑफीसर, कोथरूड अग्निशामक दल, स.नं. २७, वारजे रोड, पुणे ४११०३८ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि.०७.०४.२०१७ रोजी अर्ज करून "१) मुंबई हिंदी विद्यापीठाची साहित्य सुधारक / बी. ए. समकक्ष पदवीस अनुसरून पुणे अग्निशमन दलात प्रमोशन / पदोन्नती झाली असल्यास त्या बाबत माहिती/कार्यवाहीच्या प्रतीच्या साक्षांकित छायाप्रती मिळाव्यात. २) मुंबई हिंदी विद्यापीठास यु.जी.सी. ची मान्यता असल्यास त्या बाबत माहिती/कार्यवाहीच्या प्रतीच्या साक्षांकित छायाप्रती मिळाव्यात. मान्यता नसल्यास मला त्याबबतची कारणे मिळावीत. ३) पुणे अग्निशमन दलातील प्रमोशन/पदोन्नती बाबत मुंबई हिंदी विद्यापीठास महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या शासन निर्णयाने मान्यता दिलेली आहे. त्या बाबत माहिती /कार्यवाहीच्या प्रतीच्या साक्षांकित छायाप्रती मिळाव्यात. ४) पुणे म.न.पा. ची मुख्य सभा, मा. महापालिका आयुक्त यांच्या सदर मान्यता असल्यास, त्या बाबत माहिती/कार्यवाहीच्या प्रतीच्या साक्षांकित छायाप्रती मिळाव्यात. मान्यता नसल्यास मला त्या बाबतची कारणे मिळावीत." अशी एकूण ४ मुद्द्यावर माहिती मागितली होती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०७.०४.२०१७ | ०७.०४.२०१७ | ०६.०५.२०१७ | २५.०४.२०१७ | - |

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/४९४ दि. २५.०४.२०१७ ने अर्जदारास उत्तर दिलेले आहे. **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिलेल्या उत्तरावर अपिलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज (अपील क्र. १७/२०१७) दि. २०.०५.२०१७ रोजी दाखल केला होता.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २०.०५.२०१७ | २०.०५.२०१७ | २४.०५.२०१७ | होय | विलंब नाही. |

सदर प्रकरणी अपिल क्र. १७/२०१७ ची सुनावणी दि. ०९.०८.२०१७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री गजानन श्रीपाद पाथरुडकर,** रा. कोथरूड स्टेशन ड्युटी ऑफीसर, कोथरूड अग्निशामक दल, स.नं. २७, वारजे रोड, पुणे ४११०३८ उपस्थित नव्हते. तसेच श्री शाम तारू, **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. सदर अपिल सुनावणी चा निकाल अपिलार्थी **श्री गजानन श्रीपाद पाथरुडकर,** यांना जा. क्र. उआ(साप्र)/५७५ दि. १९.०८.२०१७ ने पाठविण्यात आलेला आहे.

दि. ०७.०९.२०१८ रोजी अपिलार्थी **श्री गजानन श्रीपाद पाथरुडकर,** रा. कोथरूड स्टेशन ड्युटी ऑफीसर, कोथरूड अग्निशामक दल, स.नं. २७, वारजे रोड, पुणे ४११०३८ यांनी अपिल क्र. १७/२०१७ ची प्रथम अपिल सुनावणी अपिलार्थी उपस्थित नसल्याने पुन्हा घेणेबाबत स्वागतकक्ष आ. क्र. ६२४२ दि. ०७.०९.२०१८ अन्वये अर्ज केला तो उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग) कार्यालयास आ. क्र. १०१०३ दि. १२.०९.२०१८ अन्वये प्राप्त झाला. अर्जदार यांच्या विनंती नुसार अपिल क्र. २६/२०१८ ने सदर अपिल दाखल झाले असून त्याची सुनावणी दि. २६.०९.२०१८ रोजी घेण्यात आली. सदर सुनावनीस अपिलार्थी **श्री गजानन श्रीपाद पाथरुडकर,** रा. कोथरूड स्टेशन ड्युटी ऑफीसर, कोथरूड अग्निशामक दल, स.नं. २७, वारजे रोड, पुणे ४११०३८ उपस्थित होते. तसेच श्री रवींद्र शेंडगे, **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

सुनावणी दरम्यान अपिलार्थी **श्री गजानन श्रीपाद पाथरुडकर,** यांनी **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिलेल्या उत्तराने आम्ही समाधानी नाही. अपिल क्र. १७/२०१७ च्या मुळ अर्जातील माहिती मिळाली पाहिजे असे नमूद केले. तर श्री रवींद्र शेंडगे **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांना जा. क्र. जमाअ/आस्था/४९४ दि. २५.०४.२०१७ रोजी उत्तर देण्यात आलेले आहे असे नमूद केले.

## आदेश

अपिलार्थी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांना त्याचे दि. ०७.०४.२०१७ चे मुळ अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती ७ दिवसात विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिल क्र. २६/२०१८ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका